| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा ५८/२०२५**<br>**सुभाष श्रीपती कांबळे**<br>**वि.**<br>**दगडु दामाजी कांबळे वगैरे ३** |

## नि.३३ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन सदरच्या अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, सदरचा दावा वादी यांनी कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये वादी यांनी दावा मिळकत प्रतिवादी यांची वडिलार्जित मालकी वहिवाटीची मिळकत असल्याचे मान्य केलेले आहे. तसेच सदर दाव्यामध्ये वादी यांनी काही क्षेत्र बापू नारायण इरळेकर यांचेकडून खरेदी घेतल्याचे नमूद आहे. तसेच प्रतिवादी यांनी वादीचे दावेस नि. २३ प्रमाणे कैफियत, म्हणणे व प्रतिदावा दाखल केलेला आहे. वादी किंवा बापू नारायण इरळेकर हे प्रतिवादी यांचे एकत्र कुटुंबातील सदस्य नसून ते तिऱ्हाईत इसम आहेत. त्यामुळे त्यांना कायद्यातील तरतुदीनुसार प्रतिवादींचे वाडवडिलार्जित मिळकतीमध्ये कायदेशीर मार्गाचा अवलंब केल्याशिवाय मालकी अगर कब्जा प्राप्त होत नाही. त्या अनुषंगाने प्रतिवादी तर्फे दाखल केलेल्या नि. २३ वरील कैफियत कलम २ नंतर २ अ व प्रतिदावेतील कलम ७ नंतर ७ अ म्हणून प्रतिदावेमध्ये दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच सदर दुरुस्ती झाल्यामुळे कोणतीही नवीन केस निर्माण होणार नाही. तसेच सदरची दुरुस्ती केल्याने वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही तरी न्यायाचे कारणास्तव प्रस्तुत कामी दुरुस्ती अर्ज मंजूर होणे गरजेचे आहे. अंतिमतः

प्रतिवादी क्र. १ तर्फे वकील यांनी दुरुस्ती अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

४. वादी तर्फे वकील यांनी असा युक्तीवाद केला की, मुळातच प्रतिवादी क्र. १ यांचा अर्ज चुकीचा व बेकायदेशीर असून तो नामंजूर होणेस पात्र आहे. तसेच वादीने सदरच्या दाव्यासोबत तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दिलेला असून सदर तुर्तातुर्त मनाई अर्जाची वादी तर्फे चौकशी पुर्ण केलेली असून प्रतिवादी तर्फे वेगवेगळी कथने करून वेगवेगळे अर्ज देवून नि. ५ अर्जाची चौकशी लांबविणेचे उद्देशाने अर्ज दिले आहेत. तसेच सदरचे कामी वादी यांनी नि. ५ चे अर्जाचा युक्तीवाद पुर्ण केल्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांनी सदरचा अर्ज दिलेला आहे. सदरची दुरुस्ती मंजूर झाल्यास प्रतिदावा व प्रतिमनाई अर्जाच्या स्वरुपामध्ये बदल होत असून त्यामुळे नवीन केस निर्माण होत आहे. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

५. प्रतिवादी क्र. १ यांचा अर्ज, वादी यांचे म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांचा मूळ दावा हा कायम मनाईकरिता दाखल करण्यात आलेला आहे तसेच सदर कामी प्रतिवादी क्र. १ मागणी करत असलेली दुरुस्ती ही स्पष्टीकरणात्मक स्वरुपात आहे असे वाटते. तसेच सदर दुरुस्ती पाहता त्याबाबत वादी यांना स्पष्टीकरण देण्याचा पुर्ण अधिकार आहे असे वाटते. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. मात्र या कामी झालेला विलंब हा दुर्लक्ष करता येणारा नाही. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**१. प्रतिवादी क्र. १ यांचा नि.३३ वरील अर्ज वादी यांना रक्कम रु. ५००/– देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.**

२. **प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिदावा व कैफियतीमध्ये दुरुस्ती १४ दिवसात करुन तात्काळ दुरुस्ती प्रत दाखल करावी.**

पन्हाळा
दि. ०४.१२.२०२५

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.